**सुरक्षा रक्षक मंडळात सुरक्षा रक्षकांची नोंदणी (registration) करण्याबाबतची कार्यप्रणाली आणि इतर निकष यामध्ये सुधारणा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**
**शासन निर्णय क्र. एसजीए-२०२४/प्र.क्र.९६/कामगार-५,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- १४ मे, २०२६

<u>वाचा</u> :-

१) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाचा शासन निर्णय क्र.एसजीए२०२४/प्र.क्र.९६/काम-५, दि. २७.०३.२०२५.

<u>**प्रस्तावना**</u> :-

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ आणि त्या अंतर्गत तयार केलेल्या योजना २००२ मधील तरतुदीनुसार राज्यातील सुरक्षा रक्षकांच्या नोकरीचे नियमन व त्यांच्या कल्याणासाठी राज्यात सुरक्षा रक्षक मंडळे स्थापन करण्यात आलेली आहेत. सुरक्षा रक्षक मंडळात नोंदीत असलेल्या मुख्य मालकाने सुरक्षा रक्षक मंडळाकडून सुरक्षा रक्षकांची मागणी केल्यास आवश्यकतेनुसार मंडळाने नोंदीत (registered) मालकास सुरक्षा रक्षक पुरविण्यासाठी तसेच योजनेची सुलभ अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातुन सदर शासन निर्गमित होण्यापूर्वी असलेल्या तरतुदींचा सर्वकष विचार करुन संदर्भाधीन शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता.

दरम्यानच्या कालावधीत सदरहु शासन निर्णयाच्या अनुषंगाने विशेषतः परिणामीत, शिफ़ारस प्राप्त व अनुकंपा तत्वावर सुरक्षा रक्षकांची नोंदणी प्रक्रीया राबविताना येणाऱ्या विविध अडचणी राज्यातील विविध सुरक्षा रक्षक मंडळांनी वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आणलेल्या आहेत. तसेच दि.३०.०९.२०२५ रोजी मा. मंत्री (कामगार) यांच्याकडे झालेल्या बैठकीमध्ये राज्यातील सर्व सुरक्षा रक्षक मंडळाचा आढावा घेण्यात आलेला होता. त्यावेळी सुद्धा सुरक्षा रक्षक मंडळांनी संदर्भाधीन शासन निर्णयाची अंमलबजावणी करताना येणाऱ्या समस्यांबाबत विदित केले होते. या व्यतीरिक्त प्रस्तुत शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याबाबत सुरक्षा रक्षकांच्या विविध संघटनांची शासनास निवेदने प्राप्त झाली आहेत. या कारणास्तव विविध आस्थापनांकडुन सुरक्षा रक्षक मंडळास सुरक्षा रक्षकांची मागणी प्राप्त होवुनही त्याची पूर्तता करणे शक्य झालेले नाही.

उपरोक्त सर्व बाबींचा आढावा घेवुन परिणामीत, मुख्य मालकाकडून शिफ़ारस प्राप्त व अनुकंपा तत्वावरील सुरक्षा रक्षकांची नोंदणी प्रक्रीया राबविताना अनुसरावयाच्या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन निर्णय :-**</u>

सुरक्षा रक्षकांच्या नोंदणी प्रक्रीयेबाबत यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या संदर्भामध्ये नमुद केलेल्या शासन निर्णयामधील परिणामीत, मुख्य मालकाकडून शिफ़ारस प्राप्त व अनुकंपा

तत्वावरील नोंदणी करावयाच्या सुरक्षा रक्षकांची नोंदणी करण्याची कार्यपध्दती, शारीरिक पात्रता, शैक्षणिक अर्हता, मैदानी परीक्षेचे निकष व इतर सर्व अटी व शर्ती यामध्ये खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहेत :-

**१. सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत कार्यरत सुरक्षा रक्षकांच्या जागी अनुकंपा तत्वावर त्यांच्या वारसाची नोंदणी करण्याबाबतचे निकष :-**

१. सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक मृत पावल्यास त्याच्या जागी प्रथम मृत सुरक्षा रक्षकाच्या पती/पत्नीस नोंदणी करण्यात येईल.

२. मृत सुरक्षा रक्षकाची पती/पत्नी इच्छूक किंवा पात्र नसल्यास त्याचे पाल्य (मुलगा किंवा मुलगी) शारीरिक व शैक्षणिक पात्रतेचे निकष पूर्ण करत असल्यास मंडळात नोंदणी करण्यांत येईल आणि मुलगा अथवा मुलगी पात्र/इच्छुक नसल्यास त्यांचे कायदेशीर वारसांची नोंदणी करण्यात येईल.

३. त्यांची नोंदणी करताना शैक्षणिक पात्रता किमान १० वी उत्तीर्ण असणे आवश्यक राहील. तसेच अनुकंपा तत्वावर नोंदणी करताना उमेदवारांची मैदानी परीक्षा घेण्याची आवश्यकता नाही.

४. या उमेदवारांची शारीरिक पात्रता खालीलप्रमाणे राहील :-

| | पुरुष उमेदवार | महिला उमेदवार |
|---|---|---|
| उंची | किमान १६२ से.मी. | किमान १५५ से.मी. |
| वजन | ५० किलो ग्रॅम | ४५ किलो ग्रॅम |
| छाती | ७९ से.मी. न फुगवता, फुगवून ८४ | -- |

५. याकरीता संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये नमूद केलेली कमाल वयाची अट रद्द करण्यात येत आहे. तथापि, किमान वय १८ वर्ष असेल.

६. मृत सुरक्षा रक्षकाच्या वर नमूद केल्याप्रमाणे कोणत्याही एकाच वारसास मंडळामध्ये नोंदणी प्रक्रियेत संधी देण्यात येईल.

७. सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या जागी अनुकंपा तत्त्वावर त्यांच्या वारसाची नियुक्ती करण्याबाबतचे प्रस्ताव संबंधित सुरक्षा रक्षक मंडळाच्या स्तरावरच अंतिम करण्यात यावेत.

८. पात्र उमेदवाराने वैद्यकीय सक्षमतेचे व चारित्र्य पडताळणीचे प्रमाणपत्र ४५ दिवसांमध्ये सादर करणे बंधनकारक राहील.

९. अनुकंपा तत्वावर नोंदणीसाठी पात्र ठरलेल्या सुरक्षा रक्षकांची मंडळाने तात्काळ नोंदणी करुन त्यांची मंडळाच्या प्रतिक्षायादीवर समावेश करुन त्यांना प्राधान्याने सर्वप्रथम आस्थापनेमध्ये वितरीत करण्यात यावे.

**३. मुख्य मालकाच्या शिफारशीनुसार नोंदणी (Recommended by Principle Employer) करण्याबाबतचे सुधारित निकषः-**

१. एखादा मुख्य नियोक्ता महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ मधील तरतुदीनुसार मंडळात नोंदीत झाल्यानंतर सदरहू नोंदीत मुख्य नियोक्त्याकडे पूर्वी खाजगी कंत्राटदारामार्फत अथवा थेट नियोक्त्याकडे कार्यरत

असलेले सुरक्षा रक्षक जर नियोक्त्यास हवे असल्यास त्या कार्यरत सुरक्षा रक्षकांच्या नावाची सदर नोंदीत मुख्य नियोक्त्याने मंडळास नोंदणी करिता लेखी व स्पष्ट शिफारस केल्यास संबंधित खाजगी सुरक्षा रक्षकांची मंडळात नोंदणी करुन नोंदीत सुरक्षा रक्षक शिफारस करणाऱ्या संबंधीत मुख्य नियोक्त्याकडे वितरीत करण्यात येईल.

२. अशी विनंती मुख्य नियोक्त्याकडुन प्राप्त झाल्यानंतर सुरक्षा रक्षक मंडळाच्या निरीक्षकांनी भेट देवुन सर्व कागदपत्रे तपासून याबाबतचा अहवाल मंडळास सादर करणे बंधनकारक राहील.

३. सदर सुरक्षा रक्षकांस तपशीलवार शारीरिक, मैदानी व शैक्षणिक पात्रतेच्या अधिन राहून मंडळात नोंदीत करुन सदर सुरक्षा रक्षकांना त्याच प्रमुख नियोक्त्यास वितरीत करण्यात यावे. त्यांची नोंदणी करताना शैक्षणिक पात्रता किमान १० वी उत्तीर्ण असणे आवश्यक राहील. तसेच याकरिता शारीरिक निकष खालीलप्रमाणे आहेत :-

| | पुरुष उमेदवार | महिला उमेदवार |
|---|---|---|
| उंची | किमान १६२ से.मी. | किमान १५५ से.मी. |
| वजन | ५० किलो ग्रॅम | ४५ किलो ग्रॅम |
| छाती | ७९ से.मी. न फुगवता, फुगवून ८४ से.मि. | -- |

४. याकरीता संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये नमूद केलेली कमाल वयाची अट रद्द करण्यात येत आहे. तथापि, किमान वय १८ वर्ष असेल.

५. अशा नोंदणीसाठी खालील अटी व शर्ती तसेच कागदपत्रांची पूर्तता करणे बंधनकारक राहील. :-

I. मुख्य मालकाने केलेले शिफ़ारसपत्र.

II. सुरक्षा रक्षकांची भविष्य निर्वाह निधी भरल्याची प्रत (दोन महिने)

III. सुरक्षा रक्षकांनी किमान ६० दिवस काम केल्याचे हजेरीपत्रक मालकाने प्रमाणित करुन देणे आवश्यक राहील.

IV. मुख्य मालकाने खाजगी कंत्राटदाराला दिलेले कार्यादेश (Work order) किंवा त्यांच्यातील करारनामा किंवा मंडळाच्या निरीक्षकांनी स्वत: तपासणी करुन शिफ़ारस केलेले सुरक्षा रक्षक काम करत असल्याबाबत खात्री करावी. कंपनीची संबंधित सर्व कागदपत्रे तपासावी.

V. मुख्य मालक तसेच खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सी यांनी संबंधित सुरक्षा रक्षक यांचे सेवाकालावधीतील संपूर्ण कायदेशीर देणी अदा केल्याची प्रमाणित प्रत मंडळास सादर करावी. तथापि या अनुषंगाने नोंदणी प्रक्रीया थांबविण्यात येवु नये. अशी देणी जास्तीत जास्त तीन महिन्याच्या आत देणे बंधनकारक राहील. त्यानंतर याबाबतचे पुरावे मंडळास सादर करावे.

६. शिफ़ारस केलेल्या सुरक्षा रक्षकांची मंडळात सुरक्षा रक्षक म्हणुन नोंदणी करण्याकरिता ज्या उमेदवारांचे वय ३५ किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशा उमेदवारांकरिता मैदानी परीक्षेतुन सुट देण्यात येत आहे.

७. मैदानी परीक्षेचे निकष व गुणांकन खालीलप्रमाणे राहतीलः-

शैक्षणिक व शारीरिक पात्रतांची पूर्तता केलेल्या उमेदवारांची मैदानी परीक्षा एकूण ५० गुणांची घेण्यात येईल. पुरुष उमेदवारांची किमान ४०० मीटर व महिला उमेदवारांची किमान २०० मीटर धावणे यास २४ गुण खालीलप्रमाणे देण्यात येतीलः-

४०० मीटर धावणे (पुरुष उमेदवार) :-

| | |
|---|---|
| ०१ मिनिट ३० सेकंद | २४ गुण |
| ०१ मिनिट ३५ सेकंद | २० गुण |
| ०१ मिनिट ४० सेकंद | १६ गुण |
| ०१ मिनिट ४५ सेकंद | १२ गुण |
| ०१ मिनिट ५० सेकंद | ८ गुण |
| ०१ मिनिट ५५ सेकंद | ४ गुण |
| ०१ मिनिट ५५ सेकंद च्या पुढे | ० गुण |

२०० मीटर धावणे (महिला उमेदवार) :-

| | |
|---|---|
| ०१ मिनिट ३० सेकंद | २४ गुण |
| ०१ मिनिट ३५ सेकंद | २० गुण |
| ०१ मिनिट ४० सेकंद | १६ गुण |
| ०१ मिनिट ४५ सेकंद | १२ गुण |
| ०१ मिनिट ५० सेकंद | ८ गुण |
| ०१ मिनिट ५५ सेकंद च्या पुढे | ४ गुण |
| ०१ मिनिट ५५ सेकंद च्या पुढे | ० गुण |

- हाताच्या सहाय्याने शरीर वर घेणे (PULL-UPS) :-
  पुरुषांकरिता एकूण ८ PULL-UPS करिता १६ गुण.
  महिलांकरिता एकूण ४ PULL-UPS करिता १६ गुण.
- गुडघे न वाकवता कंबरेपासुन वरचेवर शरीर वर उचलणे (SIT-UPS) :-
  पुरुष व महिलांकरिता करिता एकूण १० SIT-UPS करिता १० गुण.

८. संबंधित सुरक्षा रक्षकास मैदानी परिक्षेत एकूण ५० गुणांपैकी २५ गुण प्राप्त करणे बंधनकारक असेल. २५ पेक्षा कमी गुण प्राप्त झाल्यास संबंधित सुरक्षा रक्षक अपात्र ठरेल.

१०. सदर मैदानी परीक्षा ही जिल्हा पोलीस प्रशासन मार्फत तसेच आवश्यकता भासल्यास जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या सहकार्याने घेतली जाईल.

११.उपरोक्त प्रक्रीयेनुसार पात्र झालेल्या व नोंदीत झालेल्या आस्थापनेकडे वितरीत केलेल्या सुरक्षा रक्षकांना कामावर ठेवणे सदर नोंदीत आस्थापनेस बंधनकारक असेल.

१२.पात्र उमेदवाराने वैद्यकीय सक्षमतेचे व चारित्र्य पडताळणीचे प्रमाणपत्र ४५ दिवसांमध्ये सादर करणे आवश्यक असेल.

## ३. परिणामीत (Affected) सुरक्षा रक्षकांची मंडळात नोंदणी करण्याबाबतचे निकष :-

१. सुरक्षा रक्षक मंडळात मुख्य मालक म्हणून नोंदीत झाल्यानंतर सदर आस्थापनेस त्यांच्या मागणीनुसार मंडळाच्या प्रतिक्षा यादीवरील सुरक्षा रक्षक वितरीत करण्यात येतात. मंडळाचे नोंदीत सुरक्षा रक्षक त्याठिकाणी वितरीत केल्यानंतर, पूर्वी मुख्य मालकाकडे कार्यरत असलेले तसेच खाजगी एजन्सीमार्फत कार्यरत असलेल्या खाजगी सुरक्षा रक्षकांच्या नोकरीवर गदा येते. अशा सुरक्षा रक्षकांना परिणामीत (Affected) सुरक्षा रक्षक म्हणून संबोधण्यात यावे.

२. मंडळाच्या कार्यक्षेत्रातील अनोंदीत आस्थापना किंवा कंपनीस निरीक्षकांनी भेट देऊन केलेल्या कार्यवाहीचा परिणाम म्हणून जर प्रमुख नियोक्ता मंडळाकडे नोंदीत होऊन, त्यांनी त्यांचेकडील कार्यरत खाजगी सुरक्षा रक्षकांऐवजी मंडळाच्या प्रतिक्षा यादीवरील सुरक्षा रक्षकांची मागणी केल्यास सदर प्रमुख नियोक्त्यास नोंदीत करुन घेऊन त्यांना मंडळाच्या प्रतिक्षा यादीवरील सुरक्षा रक्षक वितरीत करावेत.

३. त्यानंतर संबंधित नियोक्त्याकडे काम करीत असलेल्या परिणामीत सुरक्षा रक्षकांना कायदेशीर बाबी तपासून/पूर्तता करुन त्यांना मंडळात नोंदीत करुन घ्यावे व त्यांचा समावेश प्रतिक्षायादीत करावा.

४. तथापि, ज्या मंडळाकडे प्रतिक्षायादीवर सुरक्षा रक्षकच नसतील अशा परिस्थितीत संबंधित परिणामीत (कार्यरत) सुरक्षा रक्षकांना मंडळात नोंदीत केल्यानंतर त्या आस्थापनेत वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

५. तसेच अशा आस्थापनेकडे कार्यरत असलेल्या खाजगी सुरक्षा रक्षकांना परिणामीत समजून शारीरिक व शैक्षणिक पात्रतेचे निकष पुर्ण करणे बंधनकारक राहील. त्यांची नोंदणी करताना **शैक्षणिक पात्रता किमान १० वी उत्तीर्ण असणे आवश्यक राहील.**

६. परिणामीत सुरक्षा रक्षकांच्या नोंदणीच्या अनुषंगाने संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये नमूद केलेली कमाल वयाची अट रद्द करण्यात येत आहे. तथापि, किमान वय १८ वर्ष असेल.

७. परिणामीत सुरक्षा रक्षकांच्या नोंदणीसाठी शारीरिक निकष खालीलप्रमाणे आहेत :-

| | पुरुष उमेदवार | महिला उमेदवार |
|---|---|---|
| *उंची* | *किमान १६२ से.मी.* | *किमान १५५ से.मी.* |
| वजन | ५० किलो ग्रॅम | ४५ किलो ग्रॅम |
| छाती | ७९ से.मी. न फुगवता, फुगवून ८४ से.मि. | -- |

८. परिणामीत सुरक्षा रक्षक म्हणुन नोंदणी करण्याकरिता ज्या उमेदवारांचे वय ३५ किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशा उमेदवारांकरिता मैदानी परीक्षेतुन सुट देण्यात येत आहे.

९. अशा नोंदणीसाठी खालील अटी व शर्ती तसेच कागदपत्रांची पूर्तता करणे बंधनकारक राहील :-

I. सुरक्षा रक्षकांचे भविष्य निर्वाह निधी भरल्याची प्रत (दोन महिने)

II. सुरक्षा रक्षकांनी किमान ६० दिवस काम केल्याचे हजेरीपत्रक मालकाने/खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीने प्रमाणित करुन देणे आवश्यक राहील.

III. मुख्य मालकाने खाजगी कंत्राटदाराला दिलेले कार्यादेश (Work order) किंवा त्यांच्यातील करारनामा किंवा मंडळाच्या निरीक्षकांनी स्वत: तपासणी करुन परिणामीत सुरक्षा रक्षक तिथे काम करत असल्याची खात्री करावी.

IV. मुख्य मालक / खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सी यांनी संबंधित सुरक्षा रक्षक यांचे सेवाकालावधीतील संपुर्ण कायदेशीर देणी अदा केल्याची प्रमाणित प्रत मंडळास सादर करावी.तथापि या अनुषंगाने नोंदणी प्रक्रीया थांबविण्यात येवु नये. अशी देणी जास्तीत जास्त तीन महिन्याच्या आत देणे बंधनकारक राहील. त्यानंतर याबाबतचे पुरावे मंडळास सादर करावे.

१०. उपरोक्त सर्व बाबींची पुर्तता व पडताळणी झाल्यानंतर सुरक्षा रक्षकांस नोंदीत करण्यापुर्वी आवश्यक अशी शारीरिक पात्रता तपासण्याबाबत पुढील कार्यवाही करावी.

११. मैदानी परीक्षेचे निकष व गुणांकन खालीलप्रमाणे राहतील:-

शैक्षणिक व शारीरिक निकषांची पूर्तता केलेल्या उमेदवारांची मैदानी परीक्षा एकूण ५० गुणांची घेण्यात येईल. पुरुष उमेदवारांची किमान ४०० मीटर व महिला उमेदवारांची किमान २०० मीटर धावणे यास २४ गुण खालीलप्रमाणे देण्यांत येतील:-

४०० मीटर धावणे (पुरुष उमेदवार) :-

| | |
|---|---|
| ०१ मिनिट ३० सेकंद | २४ गुण |
| ०१ मिनिट ३५ सेकंद | २० गुण |
| ०१ मिनिट ४० सेकंद | १६ गुण |
| ०१ मिनिट ४५ सेकंद | १२ गुण |
| ०१ मिनिट ५० सेकंद | ८ गुण |
| ०१ मिनिट ५५ सेकंद | ४ गुण |
| ०१ मिनिट ५५ सेकंद च्या पुढे | ० गुण |

२०० मीटर धावणे (महिला उमेदवार) :-

| | |
|---|---|
| ०१ मिनिट ३० सेकंद | २४ गुण |
| ०१ मिनिट ३५ सेकंद | २० गुण |
| ०१ मिनिट ४० सेकंद | १६ गुण |
| ०१ मिनिट ४५ सेकंद | १२ गुण |
| ०१ मिनिट ५० सेकंद | ८ गुण |
| ०१ मिनिट ५५ सेकंद च्या पुढे | ४ गुण |

हाताच्या सहाय्याने शरीर वर घेणे (PULL-UPS) :-

पुरुषांकरिता करिता एकूण ८ PULL-UPS करिता १६ गुण.

महिलांकरिता एकूण ४ PULL-UPS करिता १६ गुण.

गुडघे न वाकवता कंबरेपासुन वरचेवर शरीर वर उचलणे (SIT-UPS) :-पुरुष व महिलांकरिता करिता एकूण १० SIT-UPS करिता १० गुण.

१२. संबंधित सुरक्षा रक्षकास मैदानी परिक्षेत एकूण ५० गुणांपैकी २५ गुण प्राप्त करणे बंधनकारक असेल. २५ पेक्षा कमी गुण प्राप्त झाल्यास संबंधित सुरक्षा रक्षक अपात्र ठरेल.

१३. सदर मैदानी परीक्षा ही जिल्हा पोलीस प्रशासन मार्फत तसेच आवश्यकता भासल्यास जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या सहकार्याने घेतली जाईल.

१४. पात्र उमेदवारांना वैद्यकीय सक्षमतेचे व चारित्र्य पडताळणीचे प्रमाणपत्र ४५ दिवसांमध्ये सादर करणे आवश्यक असेल.

४. उपरोक्त नमूद सर्व सुरक्षा रक्षकांची मंडळात नोंदणी करुन आस्थापनेस वितरीत केल्यानंतर सदर सुरक्षा रक्षक वयाची ५८ वर्ष पूर्ण होईपर्यंत सुरक्षा रक्षक म्हणून मंडळामध्ये कार्यरत राहील. त्यापुढे कोणत्याही परिस्थितीत अशा सुरक्षा रक्षकास काम करता येणार नाही.

५. उपरोक्त परिच्छेद क्र.२,३ व ४ मध्ये नमूद केलेल्या नोंदणी प्रक्रीयेव्यतिरीक्त जाहिरातीव्दारे मंडळाचा समुचय पुल तयार करण्याकरिता करण्यात येणाऱ्या नोंदणीप्रक्रीयेसाठी संदर्भाधीन दि.२७.०३.२०२५ च्या शासन निर्णयानुसारच कार्यवाही करण्यात येईल.

६. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ च्या कलम ८ (४) मधील तरतूदीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संकेताक २०२६०५१४१७२६४०००१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीचे सांक्षाकिंत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS

Digitally signed by SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=3389518A88AF500EF17FD52858804C56D5B0DB93CE68C9638764849614F0C8B3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=824DB7B32ED13AAC7B6F1F11E717770B52D6784F2BC41DDF0E4E9729CDB96F88, cn=SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
Date: 2026.05.14 17:28:03 +05'30'

**(स्वप्निल कापडणीस)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा. मंत्री (कामगार) याचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री (कामगार) याचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (गृह) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व पोलीस आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
५. कामगार आयुक्त, कामगार भवन, मुंबई.
६. सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक, महाराष्ट्र राज्य.
७. संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे
८. सह आयुक्त (माथाडी) कामगार, मुंबई.
९. अध्यक्ष, सर्व जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळे.
१०. निवडनस्ती (काम-५).